
ISSN -2229-4929

RNI - No. MAHMAR 36829-2010
Post Registration No.: Akshar Wangmay - RNP/ OSD-377-2019-2021




अमेरिकन लेखिका टेरेसा पिजॉन, पीएच. डी. आणि भारतीय लेखक अरुण प्रभुणे, पीएच. डी. यांनी एकत्र काम करून सिद्ध केलेला कथासंग्रह हा जलतत्त्वाच्या तौलनिक पुराणकथा, लोककथा व दंतकथांचा असून अमेरिकेत नुकताच प्रकाशित झाला आहे. हा कथासंग्रह भारतातील जिज्ञासू वाचकांना ऑनलाईन उपलब्ध होऊ शकतो.

प्रति, ______________ Book-Post

______________

______________

______________

इंटरनेट आवृत्तीचे संकेतस्थळ
www.prabhune.com

प्रेषक,
डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, 'प्रणव' रुक्मे नगर, थोडगा रोड, अहमदपूर, जि. लातूर-४१३५१५

'अक्षर वाङ्मय' हे मासिक कॉम्प प्रिंट कल्पना प्रा. लि. ४६१/४, सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणे-४११०३० येथे मुद्रित ...

# अक्षर वाङ्मय

एप्रिल - मे - जून २०२०
वर्ष : दहावे अंक : चौथा



# ग्रामीण कथा आणि समाजवास्तव

- डॉ. नानासाहेब पवार

नव्वदोत्तर काळ हा जागतिकीकरणाचा कालखंड आहे.अर्थव्यवस्थेत झालेल्या मूलगामी बदलांमुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तन घडून आलेले आहे. झालेले हे बदल फक्त जगाच्या भौतिक पातळीवरचे नाहीत तर मानवी नातेसंबंध, त्यांचे भावनिकत्व, भाषा, समाजातील मूल्यव्यवस्था इतक्या खोलवर हे बदल झालेले आहेत. हा काळ बाजारकेंद्री आहे. त्यामुळे माणसाचे ग्राहकात रूपांतर झालेले आहे.त्यांच्या माणूसपणापेक्षा त्याचे ग्राहकत्व महत्त्वाचे मानले जात आहे.जागतिकीकरणाच्या सांस्कृतिक आक्रमणाने पूर्वापार चालत आलेले आपले संचित नष्ट केले जात आहे. अमेरिकेचा साम्राज्यवाद, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्व, वाढते संगणकीकरण आणि संपर्क माध्यमांचे अतिक्रमण, माहिती-तंत्रज्ञानाचा विस्फोट धर्मांध ध्रुवीकरण, दहशतवाद, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती आर्थिक विषमता आणि बेरोजगारी, लोकचळवळीचा होणारा ऱ्हास, इंग्रजीचा जागतिक भाषा म्हणून झालेला उदय व जगभरातील नष्ट होत असलेल्या बोलीभाषा, पर्यावरणाचा विनाश या साऱ्यांमुळे नव्वदोत्तर कालखंड काळवंडून गेल्याचे दिसते.

### जागतिकीकरणाचे ग्रामीण जीवनावरील परिणाम

जागतिकीकरण हा विषय संपूर्ण जगाला व्यापून राहिलेला आहे.कोणतेही क्षेत्र यापासून दूर नाही.उदारीकरण भारतात येऊन आता जवळपास पंचवीस तीस वर्षं उलटून गेली आहेत. या काळात जगात अनेक बदल झाले.त्यामुळे त्याचे भारतीय समाजावर सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही स्वरूपाचे परिणाम दिसू लागले.उदारीकरणामुळे देशी-परदेशी खासगी भांडवल देशात मोठ्या प्रमाणावर वाढत गेले.या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नफा असणाऱ्या क्षेत्रांना महत्त्व आले. यामध्ये उद्योग, प्रसारमाध्यमे, इंटरनेट, माहिती-तंत्रज्ञान सेवा व मनोरंजन या क्षेत्राची

भरमसाठ वाढ झाली आहे. ग्रामीण जीवनावर आशादायक आणि निराशादायक असे संमिश्र परिणाम झाले आहेत.

जागतिकीकरणानंतर ग्रामीण भागात बेकारी वाढली. रोजगाराच्या संधी कमी झाल्या, जगणे अवघड झाले. शेतीला पर्यायी उद्योगांची जोड हवी होती पण भांडवलाअभावी मिळू शकली नाही. त्यामुळे पारंपरिक व्यवसाय करणाऱ्याचे व्यवसाय हिरावून घेतले गेले.जागतिकीकरणाने समता प्रस्थापित होईल असे तत्त्व सांगितले होते.त्याचा विपरीत परिणाम होऊन सर्व क्षेत्रात विषमता मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली व त्यामुळे आर्थिक समता उलट्या दिशेने प्रस्थापित झाली. शेतीतील हे मनुष्यबळ रोजगाराच्या शोधात शहराकडे आले, खेडी ओस पडली व शहरांना सूज येऊन तिथल्या समस्या तीव्र झाल्या.

शेती आणि शेती संबंधित क्षेत्रात प्रचंड रोजगार उपलब्ध होऊ शकतो हे माहित असून सुद्धा शेतीची हेळसांड करण्यात आली.शेतीवर अवलंबून असणारे शेतकरी, शेतमजूर, आलुतेदार-बलुतेदार सारे उखडले गेले.या साऱ्यांना विस्थापित झाल्याच्या भावनेने घेरले आहे.

जागतिकीकरणाने गावगाड्यातील राजकारणाचा संबंध थेट गल्लीपासून दिल्लीपर्यंत आल्याने पूर्वी गावागावात असणारे स्नेहाचे, सौहार्दाची नाते संपुष्टात येऊन त्या जागी वर्मनस्य, शत्रुत्व निर्माण झाले. एकाच घरात वेगवेगळ्या राष्ट्रीय, प्रादेशिक पक्षातले कार्यकर्ते तयार झाले.या स्पर्धेतून, असूयेतून वाद वाढतचगेल्याने गावातील सामूहिकतेला तडा गेला.राजकीय पुढाऱ्यांनी गावागावात जातीयतेची तेढ कमी करण्याऐवजी ती वाढवली. मतासाठी जातीयतेचा, धार्मिकतेचा आधार घेतला गेला.बहुतेक शेतकरी कुठल्या ना कुठल्या पक्षात असल्याने दर्सदिन शेतीच्या कामाला प्राधान्य देण्याऐवजी तो राजकारणाला प्राधान्य देऊ लागला.परिणामतः शेतीकडे दुर्लक्ष झाले.हे सर्व चिंताजनक आहे.

जागतिकीकरणाने चंगळवादी सुखलोलुपवृत्ती जोपासली.मुख्य पाया हा भांडवलशाही असल्याने बाजारपेठेत नफेखोर मूल्यव्यवस्था वृद्धिंगत झाली.त्यामुळे सगळे नातेसंबंध बाजाराच्या भाषेत मोजले जाऊ लागली. परिणामी विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, राजकारण, शासन, शिक्षण आणि आता तर माणसामाणसातील नाती ही या मूल्यभ्रष्टतेणे पोखरले गेले असल्याने लोककल्याणकारी विधायक भूमिका निरर्थक ठरते.



एखाद्या विशिष्ट काळातील साहित्याचे स्वरूप समजून घ्यायचे असेल तर त्या काळातील समाज वास्तवही समजून घ्यावे लागेल. माणूस आणि त्याचा समाज यांना वेगळे करून कोणत्याही साहित्याचा विचार करता येत नाही. ग्रामीण कथा याला अपवाद असण्याचे कोणतेही कारण नाही. नव्वदोत्तर ग्रामीण कथेचा विचार करताना येथील ग्रामीण वास्तवाचे आणि त्यात घडून आलेल्या स्थित्यंतराचाही विचार करावा लागतो.शहरी जीवनापेक्षा ग्रामीण जीवन हे संथ असल्याचे दिसत असले तरी जागतिकीकरणाच्या काळात या ग्रामीण जीवनात लक्षणीय स्वरूपाचे बदल घडून आले.

खेड्यातला माणूस म्हणजे केवळ कृषिकेंद्रित व्यवस्थेच्या मध्यभागी असलेला शेतकरीच नाही तर शेतमजूर, कामगार, दलित, स्त्रिया असे सर्वच घटक आणि त्यांचे अस्तित्वासाठीचे संघर्षमय जगणे, या जगण्यातले ताणतणाव, त्यांचा जीवनसंघर्ष हे विषय नव्वदोत्तर कथांच्या केंद्रित असल्याचे दिसून येते.

सदानंद देशमुख यांनी 'गाभूळगाथा' या कथासंग्रहातील 'हिकमत' या कथेतून शेतकऱ्याची संसार, शेती याच्यातील उबगलेले मन चित्रित केले आहे.या कथेतील गजू नाना म्हणतो की, मीबी आता या संसारातापाले उबगलो. माह्याबी बोकांडी कर्ज झालं.जीव द्यायचा इचार करत होतो.पण आता मी हा इचार बदलला. उद्यापासून मीबी आता सुरेभान जाधवच्या टोळक्यात सामील होतो. भगवे कपडे घालतो. गळ्यात तंबोरा अडकवतो अन इठ्ठल इठ्ठल करत बसतो, जीव देण्यापेक्षा हे कधीबी परवडते. आणि मनबी होत नाही. या ठिकाणी सदानंद देशमुख शेतीचे बिघडलेले तंत्र व त्यातून आलेली ही प्रतिक्रिया चित्रित करतात.

जागतिकीकरणातील बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण किरण गुरव यांनी प्रभावीपणे केले आहे.त्यांच्या 'श्रीलीपी' या कथासंग्रहातील 'क्लॉक अवर बेसिस' या कथेतील सुशिक्षित तरुण हंगामी प्राध्यापक म्हणून एका महाविद्यालयात काम करीत असतो. अशा तरुणांपुढे अनेक प्रश्न उभे कितात. अपुरा पगार, मानसिक शोषण, तसेच वाढते वय, महत्त्वाचे म्हणजे लग्नाचा प्रश्न जो सामाजिक प्रतिष्ठेचा प्रश्न होत असतो. वरील सर्व गोष्टींमुळे आजच्या सुशिक्षित तरुणांचे लग्नाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. अशाही परिस्थितीत शिक्षणामुळे तरुणांमध्ये जो कणखरपणा आला आहे तो त्याच्या ठाम भूमिकेतून व्यक्त होतो.

आसाराम लोमटे यांनी आपल्या कथा साहित्यातून सातत्याने मराठवाड्यातील

बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे. 'आलोक' या कथासंग्रहातील 'वळण' या कथेतील वारंवार पडणारे दुष्काळ व या दुष्काळी परिस्थितीतही गरीब कुबातील मुलगी शिक्षणासाठी धडपडते आहे, याचे चित्रण या कथेतून येते. आज ग्रामीण जीवनात जी उदासीनता दिसून येते, त्याचा परिणाम म्हणून मुलं-मुली शिक्षणाकडे झपायाने वळले आहेत. त्यांना शिक्षणाशिवाय दुसरा कुठलाही पर्याय दिसत नाही. त्यातूनच ती त्याच्यासाठी धडपडत आहेत. आजचे शेतीचे वास्तव हे त्यांना लक्षात आल्यामुळे ती या व्यवस्थेकडे या दृष्टीने पाहते.

महाराष्ट्रातील शेती आजही जास्त प्रमाणात पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहे.त्यामुळे मराठवाडा, विदर्भ, खानदेश हा भाग नेहमीच अवर्षणामध्ये असतो.त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार-तिबार पेरणीचे संक उभे राहते. तसेच वेगवेगळ्या पिकांसाठी लागणारी महागडी औषधे, बियाणे, त्यासाठी खुरपणी, काढणी, मळणी, त्याला मिळणारा बाजारभाव, त्यातही दलालाकडून शेतकऱ्यांचे होणारे शोषण इत्यादींमुळे हवालदिल झालेला आजचा शेतकरी निराशेच्या गर्तेत चालला आहे. विदर्भातील बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण सदानंद देशमुख यांनी 'दळघास' या कथासंग्रहात केले आहे.

ग्रामीण भागातील मोबाईलचा वाढता वापर व त्यामुळे निर्माण झालेल्या चंगळवादी प्रवृत्तीचा तरुणांच्या मानसिकतेवर झालेला परिणाम लेखकाने येथे सूचित केला आहे. आजचा खेड्यातील तरुण प्रसारमाध्यमांच्या व भौतिक सुख-सुविधांच्या आहारी गेल्यामुळे घरची दूध देणारी म्हस विकून टीव्ही घेतलेला तरुण अशोक कोळी यांनी 'भूमी' या कथेतून साकारला आहे.

एकूण, जागतिकीकरणातील स्थित्यंतरे पचवून त्याचा अन्वयार्थ लावण्याचे काम ग्रामीण कथेने केले आहे.त्यामुळे ग्रामीण कथा ही आशय, विषय, रूपबंध यात बदलत चाललेली दिसून येते. ही कथा नेमकेपणाने समाजाला, त्यातील वास्तवाला भिडणारी, सर्वांगीण जीवनाचा वेध घेण्याची क्षमता असणारी कथा सदानंद देशमुख, आसाराम लोमटे, अशोक कोळी, किरण गुरव या कथाकारांनी आपल्या लेखनातून व्यक्त केली आहे.

भारताने नवी अर्थव्यवस्था स्वीकारली. नव्या अर्थव्यवस्थेच्या ओझ्याखाली इथला शेतकरी भरडून निघाला. जागतिकीकरण, बेरोजगारी, शिक्षणाचे बाजारीकरण, कर्जाच्या ताणाने असह्य झालेले शेतकरी आणि त्यातून त्यांच्या



आत्महत्या व याचा परिणाम म्हणजे ढासळणारे ग्रामजीवन, या ढासळणाऱ्या ग्रामजीवनाचे चित्रण ग्रामीण साहित्याने प्रामुख्याने केले त्याचे स्वरूप या ठिकाणी स्पष्ट होते. ग्रामीण संस्कृतीच्या बदललेल्या वास्तवाचे आणि त्या बदलाच्या चांगल्या वाईट परिणामांचे प्रत्यक्ष स्वरूप ग्रामीण साहित्यातून आपल्यासमोर येते.

**डॉ. नानासाहेब पवार**
मराठी विभाग,
वाघिरे महाविद्यालय, सासवड,
ता. पुरंदर, जि. पुणे
भ्रमणध्वनी- ७८७५०६९८७



**अभिनंदन ! अभिनंदन !**

ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे यांना यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्यावतीने भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कारने सन्मानित करण्यात आले. रा. रं. बोराडे यांचे अक्षर वाङ्मय परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !